**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. कैलास पांडुरंग खैरनार<br>ई-३/४०१, हरीगंगा, आर.टी.ओ. ऑफीसजवळ,<br>आळंदी रोड, येरवडा, पुणे-६ | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ उपविभाग, जि. भुसावळ | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | अप्पर पोलीस अधीक्षक, जळगाव, जि. जळगाव | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ३१२ / २०१० / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २५.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. कैलास पांडुरंग खैरनार<br>ई-३/४०१, हरीगंगा, आर.टी.ओ. ऑफीसजवळ,<br>आळंदी रोड, येरवडा, पुणे-६ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ उपविभाग, जि. भुसावळ तर्फे प्रतिनिधी श्री. विश्वजीत व. खुळे |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | अप्पर पोलीस अधीक्षक, जळगाव, जि. जळगाव तर्फे प्रतिनिधी श्री. एस. एस. जाधव |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

येरवडा पोलीस ठाण्याचे पथक आपल्या बहिणीला अटक करण्यासाठी भुसावळला गेले तेव्हा त्यांच्यासोबत महिला कर्मचारी नेमण्यात आल्याचे उत्तर आपल्याला देण्यात आले आहे.

परंतु अटक करताना महिला पोलीस कर्मचारी नव्हते. जिल्ह्याबाहेरील पोलिस अटकेसाठी आल्यानंतर असणारी कार्यपध्दती व स्थानिक पोलिसांचे जबाब याची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ यांनी दिली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) प्रमाणे माहिती ज्यांच्याकडे असेल त्यांचेकडे जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्ज पाच दिवसांत वर्ग करणे आवश्यक होते, तसे केले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. कैलास पांडुरंग खैरनार यांनी केले.

येरवड्याचे पोलिस निरीक्षक संबंधित तपासासाठी आले होते. आपल्या कक्षेतील तपासासाठी कोणत्याही पोलिस ठाण्याचे अधिकारी / कर्मचारी कोठेही जाऊ शकतात, त्याबाबत स्वतंत्र नियमावली नाही. पत्ता शोधण्यासाठी मदत मागितल्यास देणे एवढेच स्थानिक पोलिस करतात. तशी मदत भुसावळ पोलिसांनी दिली. परंतु तपास पथकाने भुसावळ पोलिसांच्या ठाणे दैनंदिनीला कोणतीही लेखी अथवा तोंडी नोंद केलेली नाही, त्यामुळे माहिती देणे शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ उपविभाग यांचे प्रतिनिधी श्री. विश्वजीत व. खुळे, सहाय्यक पोलिस निरीक्षक, भुसावळ व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधीक्षक, जळगाव यांचे प्रतिनिधी श्री. एस. एस. जाधव, सहाय्यक पोलिस निरीक्षक, जळगाव यांनी केले.

येरवडा पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती भुसावळ पोलिसांकडे नसल्याचे कळविण्या- बरोबरच जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित अर्ज येरवडा पोलिस ठाण्याच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविणे आवश्यक होते, याची समज जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ यांना देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ उपविभाग यांनी संबंधित माहिती देण्याबाबत येरवडा पोलिस ठाण्याच्या जन माहिती अधिकाऱ्यांना कळवावे. अपीलकर्त्याने मागितलेल्या नियमावलीचा संदर्भ चार दिवसांत अपीलकर्त्यास कळवावा व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ उपविभाग व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधीक्षक, जळगाव यांनी अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश

आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबतचा खुलासाही सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ श्री. इश्यु सिंधु व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधीक्षक, जळगाव श्री. धनंजय कुलकर्णी यांनी याची पूर्तता अद्याप केलेली नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्यापपर्यंत आयोगाला सादर न करण्याबाबतच्या खुलाशासह अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, भुसावळ श्री. इश्यू सिंधू व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलिस अधीक्षक, जळगाव श्री. धनंजय कुलकर्णी यांनी दि. २०.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. 24 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

प्रा.शिवाजी धोंडीबा टाकळकर
'सहजीवन', वारुळवाडी, **अपीलकर्ता**
नारायणगांव, ता.जुन्नर,
जि.पुणे

**विरुध्द**

**१. जन माहिती अधिकारी तथा सरचिटणीस,**
पुणे विद्यापीठ शिक्षक संघटना (पुक्टो), नाशिक जिल्हा,
पंचमी हौसिंग सोसायटी, निर्मल स्कूल रोड,
गंगापूर नाशिक

**२. जन माहिती अधिकारी तथा सरचिटणीस,** **उत्तरवादी**
पुणे विद्यापीठ शिक्षक संघटना (पुक्टो), नाशिक जिल्हा,
३, शीतल, जयअंबिका कॉलनी,
मालेगांव कॅम्प, जि.नाशिक

**३. जन माहिती अधिकारी तथा सरचिटणीस,**
पुणे विद्यापीठ शिक्षक संघटना (पुक्टो), अहमदनगर जिल्हा,
२३९, विद्या कॉलनी,
श्रीकृष्ण नगर, कल्याण रोड, अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१३३/पुणे+३१३४/पुणे+९९४/२००९/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवाजी धोंडीबा टाकळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. तरीही श्री.टाकळकर यांनी ज्या संस्थेतील माहिती अधिकाऱ्यांविरुध्द आयोगाकडे अपील केलेले आहे, त्या संस्थेचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेत येत असल्याबाबतचा पुरावा आयोगास सादर करणेबाबत श्री.टाकळकर यांना आयोगाच्या दि.११/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. श्री. टाकळकर यांनी त्यांच्या पत्रासोबत सदर संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्र सादर केलेले आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ज) अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण' या संज्ञेत समावेश होण्याकरिता सदरचे नोंदणी प्रमाणपत्र हा पुरेसा पुरावा ठरत नाही. वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील तीनही अपिले अमान्य करण्यात आहेत.

पुणे.
दि :- 23 JUN 2010

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.स्वप्निल माधव गुजर
स.नं.१४६, गारमाळ, ज्ञानदा शाळेजवळ, धायरी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पारनेर,
पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर,
पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पारनेर,
पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.जी.पी.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर,
पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.एस.बी.शेटे

| | |
|---|---|
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दोन शासकीय कर्मचाऱ्यांच्या मंजूर दैनंदिनीची प्रत व रजाविषयक माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर याच्याकडे दोन अर्जांद्वारे मागितली होती. परंतु माहिती कशासाठी आवश्यक आहे याचा उल्लेख नाही व एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेख विषयाची माहिती देता येत नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांनी दिले. त्याविरूध्द आपण अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांच्याकडे अपील केले, तरीही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.स्वप्निल माधव गुजर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्याने दोन अर्जांद्वारे माहिती मागितली होती. त्यातील एका अर्जात विशिष्ट स्वरूपाचे तक्ते देऊन त्यानुसार माहिती मिळावी, अशी मागणी केली हाती. सेवाविषयक अभिलेखामुळे व अशा तक्त्यात माहिती संकलित करून देणे शक्य नसल्यामुळे तसे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.एस.बी.शेटे यांनी केले. श्री.गुजर याच्या अपिलाच्या सुनावणीसाठी दोनदा तारखा दिल्या. परंतु ते उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे त्यांचे अपील निकाली काढले, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.जी.पी.शिंदे यांनी नमूद केले.

विशिष्ट तक्त्यात संकलित करून माहिती देण्याचे बंधन जन माहिती अधिकाऱ्यांवर नाही. मात्र शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवाअभिलेखविषयाची माहिती देता येणार नाही, ही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांची भूमिका योग्य नाही. हे अभिलेख हा सार्वजनिक दस्तऐवज आहे. तसेच माहिती कोणत्या कारणासाठी आवश्यक आहे हे नमूद करण्याचे बंधन अर्जदारावर घालता येणार नाही, याची समज

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांना देण्यात येत आहे. माहिती एका आठवड्यात संकलित करून देता येईल,असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांनी केले. त्यानुसार माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने दिले. त्यानुसार श्री.गुजर यांना दि.२०.५.२०१० रोजीच्या पत्राने माहिती निःशुल्क देण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर तहसील कार्यालय, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांनी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

(शिक्का: राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ)

पुणे
30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. संजय दिनकर चौधरी
११, आशिर्वाद, सेनादत्त पेठ, निशेन हट हौसिंग सोसायटी,
पुणे-३० .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तथा असिस्टंट डेपो मॅनेंजर,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.,पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१ /२०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २५.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तथा असिस्टंट डेपो मॅनेंजर,<br>पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.,पुणे श्री. नि. रा. घोगरे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,<br>पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., पुणे श्री. त्रिं. श्री. धारुरकर | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सीएनजी बसेसना बसवावयाच्या स्टेअरिंग बॉक्सची खरेदी दोन कंपन्याकडून केल्यामुळे पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. चे आर्थिक नुकसान होणार आहे. महामंडळ स्थापन होऊन तीन वर्षे झाली तरी सेवाविषयक नियम तयार नाहीत, त्यामुळे नेमणुका व बढत्या संदोष असून पदांसाठीची

अर्हता वेगवेगळया वेळी बदलल्या आहेत. पूर्वी दिलेली ज्येष्ठता यादी व आता दिलेली ज्येष्ठता यादी यात तफावत आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. संजय दिनकर चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. चौधरी यांनी मागितलेली माहिती तीन विभागांशी संबंधित होती, ती प्राप्त करुन घेऊन श्री. चौधरी यांना शुल्क कळवून विहित मुदतीत देण्यात आली. त्याविरूध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांच्याकडे केलेल्या अपिलात मूळ उत्तराच्या अनुषंगाने नवीन मुद्दे उपस्थित केले होते. मूळ अर्जाव्यतिरिक्तची अशी माहिती अपिलात उपस्थित करून माहिती मागणे योग्य नसल्याचे त्यांना स्पष्ट करण्यात आले व त्यांनी ते मान्य केले. तरीही काही कागदपत्रांच्या प्रती त्यांना सुनावणीच्या दिवशीच दिल्या. आयोगाकडील अपील अर्जात त्यांनी केलेल्या तक्रारी या मिळालेल्या माहितीवरील निर्ष्कषांच्या स्वरूपाच्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये त्याचा समावेश होत नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट डेपो मॅनेंजर, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. श्री. नितीन रामचंद्र घोगरे व अपिलीय प्राधिकारी विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. श्री. त्रिंबक श्रीपाद धारुरकर यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा असिस्टंट डेपो मॅनेंजर, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. श्री. नि. रा. घोगरे व अपिलीय प्राधिकारी तथा विधी अधिकारी, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. श्री. त्रिं. श्री. धारुरकर यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अशोक गिरीधारीलाल लोढा
आळंदी देवाची, गणेश दरवाज्यासमोर, ता. खेड, जि.पुणे .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्र. मुख्याधिकारी,
आळंदी नगरपरिषद, ता. खेड, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
बांधकाम विभाग, आळंदी नगरपरिषद, ता. खेड,जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२५/ २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २६.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. अशोक गिरीधारीलाल लोढा<br>आळंदी देवाची, गणेश दरवाज्यासमोर, ता. खेड, जि.पुणे<br>**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,<br>बांधकाम विभाग, आळंदी नगरपरिषद, ता. खेड,जि. पुणे श्री. एस. के. गिरमे | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपल्या बंगल्यासमोरील रस्त्याचे काम योग्य प्रकारे झालेले नाही. योग्य प्रमाणकानुसार व निविदेत नमूद केल्याप्रमाणे रस्ता न करता सात लाख रूपये खर्च करण्यात आले आहेत. या भ्रष्टाचाराची चौकशी होणे आवश्यक आहे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. अशोक गिरीधारीलाल लोढा यांनी केली.

अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान त्यांनी मागणी केलेली अतिरिक्त माहिती दिली आहे. रस्त्याच्या कामाबाबत तक्रारी असल्यास अपीलकर्त्याने वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करणे आवश्यक असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्र. मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, ता. खेड श्री. एम. पी. भवारी यांनी लेखी व तोंडी स्पष्ट केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड श्री. एस. के. गिरमे यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि या संदर्भातील अर्जास विहित मुदतीत उत्तर दिले गेले पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता. खेड श्री. एस. के. गिरमे यांना देण्यात येत आहे.

संदर्भित रस्त्याचे काम मूळ तरतुदीनुसार झाले की नाही, हे जाणून घेणे हा नागरिकांचा हक्क आहे. त्यामुळे संबंधित कामाच्या नेमक्या स्थितीची तपासणी होऊन माहितीची शहानिशा केली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. संदर्भित रस्त्याचे काम निविदेतील वर्णनानुसार झाले आहे की नाही, याची तपासणी करून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मध्यवर्ती इमारत, पुणे यांनी दि. ५.८.२०१० पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा व त्याची एक प्रत अपीलकर्त्याला पाठवावी.

पुणे
दि. 30 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

प्रत : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| कर्नल अमरसिंह भगवानराव पाटील<br>१३, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे-१६ | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळवा, जि. सांगली | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | विस्तार अधिकारी , पंचायत समिती, वाळवा, जि. सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ३२८ / २०१० / पुणे |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | कर्नल अमरसिंह भगवानराव पाटील<br>१३, शिवाजी हौसिंग सोसायटी,<br>सेनापती बापट रोड, पुणे-१६ |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळवा, जि. सांगली<br>श्री. मोहनराव बापूराव देशमुख |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | विस्तार अधिकारी , पंचायत समिती, वाळवा, जि. सांगली<br>श्री. संजय महादेव माने |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

दुसऱ्या पत्नीचा मुलगा म्हणून वारसा हक्काने आपल्या वडिलांचे नाव मिळकतीला लागणे आवश्यक होते, परंतु ते लागले नसून त्याबाबतची माहिती दिली जात नाही. सन २००३ मध्ये नाव नोंदणीबाबत तहसीलदार, वाळवा यांनी केलेल्या चौकशीत चुलत भावाने जबाब दिला, परंतु आपण

केलेल्या अर्जांवर ग्रामपंचायतीने कोणतीही कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता कर्नल अमरसिंह भगवानराव पाटील यांनी केली.

संबंधित चौकशीतील जबाब खरे की खोटे याचे निवेदन आपण जिल्हाधिकाऱ्यांना पाठवावे, अशी श्री. पाटील यांची मागणी आहे. तो आपल्या अधिकारातील भाग नाही, मूळ अभिलेखानुसार दस्त ऐवजांच्या प्रती श्री. पाटील यांना दिल्या आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वाळवा ग्रामपंचायत श्री. मोहनराव बापूराव देशमुख यांनी केले.

सन १९३१ मध्ये झालेल्या फेरफारानुसार ग्रामपंचायत दप्तरी नोंद आहे. अपीलकर्त्याची मागणी असलेली वारसनोंद त्यावेळी लागलेली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाळवा, इस्लामपूर, जि. सांगली श्री. संजय महादेव माने यांनी केले.

अपीलकर्त्याची मूळ अर्जातील मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 24 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत बाबुराव जगताप
मु.पो.ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व
मुद्रांक निरीक्षक कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हनुमंत बाबुराव जगताप
मु.पो.ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय),
महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.ए.आर.देवगुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व
मुद्रांक निरीक्षक कार्यालय, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.५.२०१० रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२०.५.२०१० रोजी घेण्यात आली.

दुय्यम निबंधक, खंडाळा यांनी बेकायदेशीरपणे दस्त नोंदविल्याबाबत त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यास आपण परवानगी मागितली होती. त्याबाबत काहीही कळविले नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.हनुमंत बाबुराव जगताप यांनी केले.

श्री.जगताप यांनी दि.७.९.२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती संबंधित कार्यासनाकडून मागवून घेऊन दि.३.१०.२००९ च्या पत्रान्वये दिली. फौजदारी गुन्हा नोंदविण्याच्या संदर्भात नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांच्या स्तरावर प्रकरण दाखल असून त्यांच्या निर्णयानंतर त्याबाबत माहिती देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.सी.बी.भुरकुंडे यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मूळ तक्रारीबाबत उपमहानिरीक्षक, मुद्रांक व नोंदणी विभाग, पुणे यांच्या निर्णयानुसार करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशाच्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१५.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेश दिनकर सावंत
३७, वसंत कॉलनी, दिप इंटरप्राइजेसजवळ, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन
सोसायटी, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन
सोसायटी, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५१ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेश दिनकर सावंत
३७, वसंत कॉलनी, दिप इंटरप्राइजेसजवळ, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन
सोसायटी, सांगली श्री.श्रीकांत केशवराव पाटील

| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी, सांगली या संस्थेकडील माहिती दोन अर्जांद्वारे आपण मागितली होती. विहित मुदतीत उत्तर आले नाही म्हणून स्मरणपत्र पाठविले. त्यानंतर शुल्क कळविले. परंतु विलंब झाला असल्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी. तसेच दहा रूपये शुल्क आपल्याला भरावयास लावले. ती रक्कम परत मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजेश दिनकर सावंत यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी, सांगली यांनी विहित मुदतीत अपीलकर्त्यास दूरध्वनीवर संपर्क साधून अभिलेख अवलोकनासाठी येण्यास कळविले. त्यांच्या सोयीच्या तारखेनुसार त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करून दिलेल्या यादीनुसार उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.२,३,५ व ७ ही कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे त्यांनी अभिलेख निरीक्षणाच्या वेळी स्पष्ट केले. १९ वर्षांच्या काळातील ही माहिती असून महापुरात अभिलेख खराब झाले आहेत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी, सांगली श्री.श्रीकांत केशवराव पाटील यांनी केले. मात्र आपण मागितलेली विशिष्ट कागदपत्रे उपलब्ध नाहीत, असा आक्षेप अपीलकर्ता श्री.राजेश दिनकर सावंत यांनी नोंदविला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अभिलेखाचे निरीक्षण करून अपीलकर्त्याने आवश्यक माहिती प्राप्त करून घेतली आहे. काही अभिलेख आपल्याला अवलोकनासाठी उपलब्ध करून दिले नाहीत, असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. परंतु जन माहिती

अधिकारी तथा कार्यवाह, यंगमेन्स मॉडेल एज्युकेशन सोसायटी, सांगली श्री.श्रीकांत केशवराव पाटील यांनी त्याचा इन्कार केला.

अपीलकर्त्यास पुन्हा सर्व संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन ५० पृष्ठापर्यंतच्या प्रती नि:शुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. रामेश्वर पाटीलबुवा नागरे<br>माध्यमिक विद्यालय, कुळे, ता. मुळशी, जि. पुणे | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय सायगाव,<br>ता. खेड, जि. पुणे | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, पुणे | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ३६७ / पुणे /२०१० |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय सायगाव,<br>ता. खेड, जि. पुणे श्री. बाळकृष्ण मुरलीधर कोरडे |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. के.एन. चौधरी |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिक्षकांचे हजेरी पत्रक लिहिणाऱ्याची नावे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, कुळे, ता. मुळशी यांनी न दिल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. रामेश्वर पाटीलबुवा नागरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जून १९९८ ते एप्रिल १९९९ या काळातील माहिती श्री. नागरे यांनी मागितली असून अशा प्रकारचे अभिलेख ठेवले जात नाहीत, असे त्यांना लेखी कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, कुळे, ता. मुळशी यांनी केले. नसलेल्या अभिलेखाच्या मागणीसाठी श्री. नागरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील करणे योग्य नाही, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 23 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धैर्यशील रामदास पाटील
श्री.रामदास महादेव पाटील
मु.पो.भवानीनगर शिक्षक कॉलनी नं.१,
रुम नं.७, ता.इंदापूर,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
माळशिरस तहसील कार्यालय,
ता.माळशिरस, जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी तहसीलदार,
माळशिरस तहसील कार्यालय,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.०५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धैर्यशील रामदास पाटील
श्री.रामदास महादेव पाटील
मु.पो.भवानीनगर शिक्षक कॉलनी नं.१,
रुम नं.७, ता.इंदापूर,जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
माळशिरस तहसील कार्यालय,
ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.वैभव व्ही.नावडकर

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
माळशिरस तहसील कार्यालय,
ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती एम.टी.निंबाळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

गायरानात २३ व्यक्तींनी अतिक्रमण करुन बांधकामे केल्याच्या संदर्भात मंडल अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानुसार केलेल्या कारवाईची माहिती आपण मागितली होती. परंतु कोणतीही कारवाई केलेली नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, माळशिरस तहसील कार्यालय, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती एम.टी.निंबाळकर यांनी कळविले. कारवाई त्वरित होणे आवश्यक होते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.धैर्यशील रामदास पाटील यांनी केले.

कारवाई केली नसल्याची माहिती ॲड.पाटील यांना या संदर्भातील त्यांच्या प्रत्येक पत्रावर व अर्जावर दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी तहसीलदार,माळशिरस तहसील कार्यालय, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्रीमती एम.डी.निंबाळकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. कारवाई करणे-न करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 29 JUN 2010

**SSराज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. वजीर मोहमंद शेख ..
रा. गांधी चौक, दौंड, ता. दौंड, जि. पुणे .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवकारी अभियंता,
महाराष्ट्र विज वितरण कंपनी, केडगाव, ता. दौंड, जि. पुणे .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ अभियंता,
दौंड उपविभाग, महाराष्ट्र विज वितरण कंपनी, दौंड, ज़ि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २५.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** : श्री. वजीर मोहमंद शेख<br>रा. गांधी चौक, दौंड, ता. दौंड, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यवकारी अभियंता,<br>महाराष्ट्र विज वितरण कंपनी, केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. संतोष गंगाराम मोरे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ अभियंता,<br>दौंड उपविभाग, महाराष्ट्र विज वितरण कंपनी, दौंड, जि. पुणे श्री. दिनेश हनुमंतदास अग्रवाल | |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अनधिकृत इमारतीच्या वीज जोडणी संदर्भातील माहिती अपूर्ण मिळाली. वीज जोडणीसाठी केलेल्या अर्जासोबत सादर केलेल्या बांधकाम प्रमाणपत्राची प्रत न्यायालयीन कामासाठी मिळणे आवश्यक असून ती दिलेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. वजीद मोहंमद शेख यांनी केली.

संबंधित इमारत अनधिकृत असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. हा मंडळाच्या निर्णयाचा विषय नाही. वीज जोडणीसाठी सन १९७० ते १९९८ या काळात आलेल्या अर्जासंबंधाची माहिती श्री. शेख यांनी मागितली होती. जुने कागदपत्र असल्यामुळे शोधण्यास विलंब झाला, तसेच सन २००२ मध्ये वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर आलेल्या मोर्चाच्या वेळी कंपनीच्या कार्यालयाला व कागदपत्रांना आंदोलकांनी आग लावली होती, त्यामुळे काही कागदपत्रे गहाळ झाली आहेत. उपलब्ध सर्व माहिती दिली असून बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र वीज जोडणी अर्जासोबत असणे बंधनकारक नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, दौंड उपविभाग, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, दौंड, जि. पुणे श्री. दिनेश हनुमंतदास अग्रवाल व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र वीज वितरण कंपनी, केडगाव, ता. दौंड, जि. पुणे श्री. संतोष गंगाराम मोरे यांनी केले. ते लक्षात घेता माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित सर्व संचिकांचे अवलोकन करता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. फारूक ईकबाल बागवान<br>लक्ष्मी मार्केट, सारवान गल्ली, मिरज, जि. सांगली | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | उपायुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, जि. सांगली | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | प्रभाग अधिकारी, प्र.स.४,<br>सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,<br>जि. सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ३९७+ ४०३ / २०१० / सांगली |
| २ | **सुनावणीची तारीख** | २६.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. फारूक ईकबाल बागवान<br>लक्ष्मी मार्केट, सारवान गल्ली, मिरज, जि. सांगली |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका, जि. सांगली<br>श्री. एस. बी. गोसावी |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | प्रभाग अधिकारी, प्र.स.४,<br>सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि. सांगली श्री. रमेश सुखदेव वाघमारे |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

**<u>अपील क्र. ३९७/२०१०/सांगली</u>**

पूर्वीच्या तारखा घालून झोपडपट्टीत नियमबाह्यरीत्या वीज जोड दिले गेले आहेत, त्याबाबतची माहिती प्रथम प्रश्नार्थक स्वरूपाची म्हणून नाकारली व नंतर दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. फारूक ईकबाल बागवान यांनी केली.

अपीलकर्ता श्री. बागवान यांनी सरसकट व मोघम स्वरूपात माहिती मागितली आहे. 'सन २००४ ते २००९ अखेर मिरज बांधकाम विभागाकडे आलेल्या नागरिकांचे तक्रार अर्ज व त्यावरील कार्यवाही' अशा स्वरूपाचे हे मुद्दे आहेत. नेमकी माहिती विचारण्याबाबत त्यांना पाठविले. अशी माहिती तयार करून देऊ केली असता त्यांनी नाकारली. अपीलकर्त्याने सर्व अभिलेख निरीक्षणासाठी मागितले असून ते मोठ्या प्रमाणात असले तरी उपलब्ध करून देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिले. प्रत्यक्ष विनंती करूनही श्री. बागवान यांनी माहिती स्वीकारली नाही, टपालाने पाठविलेली माहिती घेतली नाही. महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागातर्फे अतिक्रमण काढले जात असताना श्री. बागवान यांनी अडथळा आणल्यामुळे त्यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे, त्यामुळे ते अशा तक्रारी करीत आहेत, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्र.स.४, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. रमेश सुखदेव वाघमारे यांनी केले.

अपीलकर्त्याने अत्यंत ढोबळ मानाने व विस्तृत स्वरूपाची माहिती व अभिलेख निरीक्षणासाठी देण्याची मागणी केली होती. तरीही अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी श्री. एस. बी. गोसावी यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावरील सरसकट स्वरूपातील अभिलेखाची अवलोकनाची मागणी केली आहे. ते उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्र.स.४, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी नमूद केले आहे. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन करून अपीलकर्त्याने आवश्यक तर माहिती प्राप्त करून घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क प्राप्त करून द्यावी.

**अपील क्र. ४०३/२०१०/सांगली**

अपीलकर्ता यांच्या दि. २८.११.२००९ च्या अर्जाला जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्र.स.४, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दि. ५.१२.२००९ रोजी उत्तर दिले. सन '२००४ ते २००९ या कालावधीत मिरज शहरात व इतर परिसरामध्ये अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम झाले असल्यास' व त्याबाबत कारवाई केली असल्यास त्याबाबतचे अभिलेख अपीलकर्त्यास निरीक्षणासाठी उपलब्ध करून द्यावेत व शासन निर्णयाच्या प्रती मोफत द्याव्यात, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिले. त्यानुसार श्री. बागवान यांना माहिती देऊ केली असता त्यांनी स्वीकारली नाही, त्यामुळे रजिस्टर्ड टपालाने पाठविली. तीही त्यांनी स्वीकारली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्र.स.४, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. रमेश सुखदेव वाघमारे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 23 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.महेश जयकुमार उपाध्ये
मु.पो.कापशी (सेनापती),
ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
माध्यमिक शिक्षण विभाग,
जिल्हा परिषद कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
प्रबुध्द भारत हायस्कूल, लक्षतीर्थ वसाहत,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९८/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/१२/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३/०३/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्रबुध्द भारत हायस्कूल, कोल्हापूर मधील शिक्षकांच्या सेवाजेष्ठता, शिक्षक संख्या, वर्ग संख्या, तुकडया, इ. बाबतची माहिती | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.३०/१२/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमांस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रबुध्द भारत हायस्कूल या हे अनुपस्थित होत्या. अपिलीय प्राधिकारी

तथा शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, हे उपस्थित होते. शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, यांनी दि.२४/१२/२००८ च्या पत्रान्वये सादर केलेला अहवाल, जन माहिती अधिकारी यांचे दि.३०/१२/२००८ चे निवेदन विचारात घेऊन अपीलकर्त्यास तात्काळ विनामूल्य माहिती देणेबाबत मौखिक आदेश देण्यात आले आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, प्रबुध्द भारत हायस्कूल, कोल्हापूर यांनी अपीलकर्त्यास तात्काळ नि:शुल्क माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :- 29 JUN 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. दिपक मारूती साळुंखे<br>द्वारा श्री. धोंडीराम मारूती सुर्यवंशी<br>नानजकर घर नं.३४४, बुरूड गल्ली, सांगली | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | अध्यक्ष, मुस्लिम एज्युकेशन कमिटी, सांगली | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | सचीव, मुस्लिम एज्युकेशन कमिटी, सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ४१४ /२०१० / सांगली |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | सचीव, मुस्लिम एज्युकेशन कमिटी, सांगली<br>श्री. हरूण इस्हाक परांडे |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

मुस्लिम एज्युकेशन कमिटी, सांगली ही सार्वजनिक विश्वस्त संस्था असून संस्थेला शासनाकडून अनुदान प्राप्त होत नाही. संस्थेच्या ज्या शाळांना / शिक्षकांना अनुदान मिळते त्याबाबतची माहिती — अपीलकर्ता श्री. दिपक मारूती साळुंखे स्वतंत्रपणे संबंधितांकडून घेऊ शकतात. मात्र सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. साळुंखे यांनी सादर केलेले नाहीत. तसेच अपीलकर्त्याने दारिद्र्य रेषेखालील

शिधापत्रिकेची प्रत पाठविली असून ती श्रीमती अनुसया बजरंग सुर्यवंशी यांच्या नावाची आहे. त्यात अपीलकर्त्याच्या नावासमोर 'कुटुंब प्रमुखाशी नाते' या रकान्यामध्ये 'पुतण्या' असे लिहिले आहे. श्रीमती सुर्यवंशी यांच्या पुतण्याचे नाव साळुंखे कसे असू शकते, म्हणून मूळ शिधापत्रिका दाखविण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले होते, त्यांनी तसे केले नाही. अन्य व्यक्तीच्या शिधापत्रिकेचा गैरवापर अपीलकर्ता करीत आहेत की काय हे तपासले पाहिजे, असे प्रतिपादन मुस्लिम एज्युकेशन कमिटीचे सचीव श्री. हारूण इस्हाक परांडे यांनी केले. त्यांचे निवेदन व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 23 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश भिमराव जाधव<br>१६, सहयोगनगर जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ४२० / २०१० / सोलापूर |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. महेश भिमराव जाधव<br>१६, सहयोगनगर जलशुध्दीकरण केंद्राजवळ, पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

एम.कॉम. एम.एड. एम.पी.एड. पदवीचा विषय टॅक्सेशन हा असल्यास शिक्षक म्हणून मान्यता देता येत नसताना तशा मान्यता शिक्षणधिकारी कार्यालयाने दिल्या आहेत. या बेकायदेशीर मान्यतेबाबत पुरावे दिल्यास कारवाई करणार काय? व कोणती कारवाई करणार?, याचे उत्तर जन माहिती अधिकारी

व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर दिले जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. महेश भिमराव जाधव यांनी केली.

सन १९८९ मधील एका शिक्षकाच्या नियुक्तीला तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेल्या मान्यतेचा हा विषय असून श्री. जाधव सातत्याने त्याबाबत मागणी करीत आहेत. त्याबाबत मुख्याध्यापकांविरूध्द कार्यवाहीचे पाऊल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. १.१२.२००९ रोजी उचलले आहे. मात्र हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर यांनी केले.

जन माहिती अधिकारी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी माहिती मागणीच्या अर्जावर केलेली कार्यवाही रास्त आहे. अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 22 JUN 2010